**प्रेस नोट**

अँन्टी करप्शन ब्युरो,जळगाव
दि.२७/०२/२०२५

**आलोसे महेशकुमार भाईदास सोनवणे , वय ५० वर्षे , तलाठी,शेवगे बुद्रुक ग्रामपंचायत ,ता.पारोळा रा.प्लॉट नं.४६,आल्हाद नगर ,पिंपळे रोड,अमळनेर ,जि.जळगाव (महसुल विभाग वर्ग ३)यांनी ६,०००/- रु. लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्ट्राचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत**

------------------------------------------OOO------------------------------------------

यातील फिर्यादी व त्यांचे भाऊ ज्ञानेश्वर पाटील यांची शेवगे बु.ता.पारोळा,जि.जळगाव येथे मुळ गावी ५५ आर शेतजमीन आहे. सदर शेतजमीनीची सन २०२१ खातेफोड होवुन त्यामध्ये एकुण २४ प्लॉट पडले आहेत. त्यापैकी फिर्यादीचे हिश्यावर गट क्र.४ मध्ये प्लॉट नं.९,१३,१८,१९ व त्यांचा मोठा भाऊ ज्ञानेश्वर नारायण पाटील याचे हिश्यावर प्लॉट नं.२०,२१,२२,२३, २४ असे एकुण ९ प्लॉट आलेले आहेत. सदर ९ प्लॉटवर फिर्यादी व त्यांचे भावाच्या नावाच्या एकुण ९ नोंदी लावुन देण्याचे मोबदल्यात वर नमुद आलोसे यांनी प्रत्येक नोंद घेण्याकरिता ११३०/—रुपये प्रमाणे फिर्यादी व त्यांचे भावाकडे १०,१७०/—रुपयांची मागणी केले बाबत फिर्यादी यांनी दि.२७.०२.२०२५ रोजी सापळा पथका समक्ष सविस्तर तक्रार लिहुन दिली होती.

सदर तक्रारीची २७.०२.२०२५ रोजी ला.प्र.वि.जळगाव येथील सापळा पथकाने पडताळणी केली असता वर नमुद आलोसे यांनी फिर्यादी यांचे मुळ गाव शेवगे बुद्रुक,ता.पारोळा येथील शेतीची खातेफोड झाल्यानंतर गट नंबर ४ मधील फिर्यादीचे हिश्यावर आलेल्या प्लॉट नं.९,१३,१८,१९ व त्यांचे मोठे भाऊ ज्ञानेश्वर पाटील यांचे हिश्यावर आलेल्या प्लॉट नं.२०,२१,२२,२३,२४ अशा एकुण ९ प्लॉटवर त्या दोघांच्या नावाच्या नोंदी लावुन देण्याच्या मोबदल्यात प्रत्येक नोंदीसाठी ११३०/—रुपये प्रमाणे १०,१७०/— रुपये लाच रकमेची मागणी करुन, तडजोडीअंती फिर्यादीकडुन ६,०००/—रुपये लाच रक्कम घेण्याचे मान्य करुन सदर लाच रक्कम दि.२७.०२.२०२५ रोजी १७.३० वाजेचे सुमारास पारोळा गावातील सरकारी दवाखान्या समोर कासोदा चौफुली जवळ सार्व.जागी पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.भारत तांगडे ,पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा.श्री.माधव रेड्डी ,अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन पुढील तपास श्री.योगेश जी.टाकूर ,पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.जळगाव करीत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगाव तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगाव कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहीजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दुरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी लँडलाईन ते लँडलाईन व मोबाईल ते लँन्डलाईन अशी टोल फ्रि नं. १०६४ ची सेवा सुरु करण्यात आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली संबंधी व करावयाच्या तक्रारी संधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अ.नं. | युनिटचे नाव | दुरध्वनी क्रमांक | टोल फ्रि नंबर |
|---|---|---|---|
| १ | जळगाव | ०२५७ - २२३५४७७ | १०६४ |
| २ | नाशिक | ०२५३ - २५७५६२८ , २५७८२३० | १०६४ |
| ३ | अहमदनगर | ०२४१ - २४२३६७७ | १०६४ |
| ४ | धुळे | ०२५६२ - २३४०२० | १०६४ |
| ५ | नंदुरबार | ०२५६४ - २३०००९ | १०६४ |

पोलीस उप अधिक्षक अँटी करप्शन ब्युरो,जळगाव

योगेश जी.ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव